# नगर परिषद कार्यालय,मलकापूर

प्रशासकीय सभा ठराव क्रमांक 1 दिनांक 11 /05/2022

## कार्यवृत्त

आज दिनांक 11 /05/2022 रोजी सकाळी 11 वाजता मा.प्रशासक महोदय,नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या सहाय्यक मिळकत व्यवस्थापक,आरोग्य विभाग व बांधकाम विभाग मलकापूर यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरीता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

1. बुलडाणा रोड व नांदुरा रोड व स्टेशन रोडवरील दुभाजकावरील विद्युत पोल व हायमास्क लाईटचे पोलवर तसेच चौकात रस्त्याचे मुख्य रस्त्यावर होर्डींग्ज,बॅनर , झेडें दुकानदाराच्या जाहीरातीचे फलक अथवा कोणत्याही प्रकारचे फलक न लावण्याबाबत.
2. सन 2021-202 मध्ये 14 व्या वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा संकलन व वाहतुकीचे कामास 2022-2023 करीता दिनांक 1 एप्रिल 2022 ते 30 जून 2022 पर्यत सन 2021-2022 चे कंत्राटदारास कार्योत्तर मंजूरी अधीन राहून दिलेल्या मुदत वाढीस मान्यता देणे.
3. सन 2021-22मध्ये 15 व्या वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा प्रक्रियेचे कामास 2022-2023 करीता दिनांक 1 एप्रिल 2022 ते 30 जून 2022 पर्यत कार्योत्तर मंजूरीस अधीन राहून दिलेल्या मुदत वाढीस मान्यता देणे.
4. प्रभाग क्र.2 शिवाजी नगर वार्डातील डॉ.ज्ञानदेव पाटील ते श्री येडेश्वरी देवी मंदीर पर्यत टाकण्यात आलेल्या पिण्याच्या पाण्याच्या प्रेशर लाईनला अंतर्गत गल्ल्यांमध्ये जोडणी करणे व जुन्या पाईप लाईन वरील नळ कनेक्शन नवीन लाईनवर शिफ्टींग करणेबाबत.
5. प्रभाग क्र.2 शिवाजी नगर वार्डातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते श्री.येडेश्वरी देवी मंदीरापर्यत ट्री-मिक्स सिमेंट कॉंक्रीट रस्ता व गटार बांधणेबाबत

6 अल्पसंख्यांक योजने अंतर्गत सन 2021-22 करीता मंजूर

त्यानुसार सहाय्यक मिळकत व्यवस्थापक,आरोग्य निरीक्षक,व पाणी पुरवठा अभियंता तसेच नगर अभियंता बांधकाम विभाग,नगर परिषद मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालाचे व अहवालावरील मुख्याधिकारी यांच्या टिप्पणीचे वाचन सभे समोर करण्यात आले.

विषय क्र.1 मलकापूर नगर परिषद बुलडाणा रोड व नांदुरा रोड व स्टेशन रोडवरील दुभाजकावरील विद्युत पोल व हायमास्क लाईटचे पोलवर तसेच चौकात रस्त्याचे मुख्य रस्त्यावर होर्डीग्ज,बॅनर ,झेडें दुकानदाराच्या जाहीरातीचे फलक अथवा कोणत्याही प्रकारचे फलक न लावण्याबाबत.

वरील विषयासंबधीची मा.मुख्याधिकारी यांनी सादर केलेल्या टिप्पणीचे वाचन व विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,सदयस्थितीत मलकापूर शहरातील बुलडाणा रोड व नांदुरा रोड व स्टेशन रोड हा मुख्य रहदारीचा मार्ग असल्याने या रस्त्यावरील विद्युत पोलवर व हायमास्क लाईटचे पोलवर तसेच डिवायडर वर मोठया प्रमाणात राजकीय पक्षाचे,सामाजिक व धार्मीक कार्यक्रमाचे तसेच शुभेच्छा व जाहिरातीचे होर्डीग्ज,फ्लेक्स बोर्ड लावण्यात येतात तसेच रस्त्याचे दुभाजकावर बोर्ड ठेवण्यात येतात. सदर बोर्ड बांधण्यात कसुर झाल्यास किंवा डिवायडर वरील बोर्ड वाऱ्यामुळे पडल्यास अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.परिणामी शहरातील रहदारीस अडथळा निर्माण होत आहे.व अपघात होण्याचे तसेच अपघाताचे प्रमाण वाढ होवून जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही दिवसा अगोदर नगर परिषदेच्या यंत्रणेद्वारे मोहीम राबवून सदर होर्डीग्ज,फ्लेक्स बोर्ड,झेंडे काढण्यात आलेले आहे.

यानंतर उपरोक्त शहरातील तिन्ही रस्त्यावर व बुलडाणा रोड,नांदुरा रोड,स्टेशन रोडवरील डिवायडर,विद्युत पोल व हायमास्क लाईटचे पोलवर राजकीय पक्षाचे,सामाजिक व धार्मीक कार्यक्रमाचे तसेच शुभेच्छा व जाहिरातीचे झेंडे, होर्डीग्ज,फ्लेक्स बोर्ड,फलक तसेच शासकीय / निमशासकीय संस्थेच्या जागेवर

तसेच रस्त्यावर अडथळा निर्माण होईल अशा पध्दतीने लावण्यात येवू नये.व रस्त्याचे दुभाजकावर बोर्ड ठेवण्यात येवू नये.

जर कोणत्याही राजकीय पक्षाचे,सामाजिक व धार्मीक कार्यक्रमाचे तसेच शुभेच्छा व जाहिरातीचे झेंडे,होर्डीग्ज,फ्लेक्स बोर्ड,फलक विना परवानगी लावतील अशांवर महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण कायदा 1995 अंतर्गत नमुद असलेल्या विविध कलमान्वये व प्रचलीत कायद्यान्वये कारवाई करण्यास प्रशासकीय मान्यता देत आहे.

विषय क्रमांक 2. सन 2021-2022 मध्ये 14 व्या वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा संकलन व वाहतुकीचे कामास 2022-2023 करीता दिनांक 1 एप्रिल 2022 ते 30 जून 2022 पर्यत सन 2021-2022 चे कंत्राटदारास कार्योत्तर मंजूरीस अधीन राहून दिलेल्या मुदतवाढीस मान्यता देणे.

वरील विषयासंबधीची मा.मुख्याधिकारी यांनी सादर केलेल्या टिप्पणीचे वाचन व विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,घनकचरा संकलनाचे कामाकरीता सन 2022-2023 साठीची निवीदा प्रक्रीया प्रलंबित असल्याकारणाने तसेच सदर काम सुरु ठेवणे शहरात स्वच्छता ठेवणे अत्यावश्यक असल्यामुळे नगर परिषदेच्या सक्षम प्राधिकरणाच्या कार्योत्तर मंजूरीस अधीन राहून नविन निवीदा प्रक्रीया पूर्ण होवून कार्यारंभ आदेश होईपर्यत अथवा जास्तीत जास्त तीन महिने सदर कामास 15 व्या वित्त आयोग निधी अंतर्गत मुदतवाढ देणे आवश्यक होते.करीता मुदतवाढ देवून सदर मुदतवाढीच्या कालाधीतील या कामाचा खर्च 15 व्या वित्त आयोगाच्या निधीमधून करण्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घ्यावी लागेल.त्यानुसार सदर कामाचे सन 2021-2022 चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राइजेस,गंगापूर यांना दिनांक 31/03/2022 रोजी मूळ करारनाम्यातील अटी शर्तीना अधीन राहून दिनांक 01/04/2022 ते दिनांक 30/06/2022 पर्यत एकूण तीन महिने मुदतवाढ देण्यात आली आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करता सदर कामाचे सन 2021-2022 चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राइजेस,गंगापूर यांना दिनांक 31/03/2022 रोजी मूळ करारनाम्यातील अटी शर्तीना अधीन राहून दिनांक 01/04/2022 ते दिनांक 30/06/2022 पर्यत एकूण तीन महिने मुदतवाढ देण्यात आली असल्याचे आरोग्य निरीक्षक यांना टिप्पणीत नमुद केले आहे.त्यानुसार सदर कामास मुदवाढीसह कार्योत्तर मान्यतेसह प्रशासकीय तथा वित्तीय मान्यता देण्यास हि सभा मंजूरात देत आहे.

विषय क्रमांक 3. सन 2021-2022 मध्ये 15 व्या वित्त आयोगनिधी अंतर्गत घनकचरा प्रक्रियेचे कामास 2022-2023 करीता दिनांक 1 एप्रिल 2022 ते 30 जून 2022 पर्यत कार्योत्तर मंजूरीस अधिन राहून दिलेल्या मुदत वाढीस मान्यता देणे.

वरील विषयासंबधीची मा.मुख्याधिकारी यांनी सादर केलेल्या टिप्पणीचे वाचन व विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,घनकचरा संकलनाचे कामाकरीता सन 2022-2023 साठीची निवीदा प्रक्रीया प्रलंबित असल्याकारणाने तसेच सदर काम सुरु ठेवणे अत्यावश्यक असल्यामुळे नगर परिषदेच्या सक्षम प्राधिकरणाच्या कार्योत्तर मंजूरीस अधीन राहून नवीन निवीदा प्रक्रीया पूर्ण होऊन कार्यारंभ आदेश होईपर्यत अथवा जास्तीत जास्त तीन महिने सदर कामास 15 व्या वित्त आयोग निधी अंतर्गत मुदतवाढ देणे आवश्यक होते.करीता सदर मुदतवाढ देऊन सदर मुदतवाढीच्या कालावधीतील या कामाचा खर्च 15 वित्त आयोगाच्या निधी मधुन करण्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घ्यावी लागेल.त्यानुसार सदर कामाचे सन 2021-2022 चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राइजेस,गंगापुर यांना दिनांक 31/03/2022 रोजी मूळ करारनाम्यातील अटी शर्तीना अधीन राहून दिनांक 01/04/2022 ते दिनांक 30/06/2022 पर्यत ऐकूण तीन महिने मुदतवाढ देण्यात आलेली असल्याचे आरोग्य निरीक्षक यांनी टिप्पणीत नमुद केले आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करता सन 2021-2022 मध्ये 15 व्या वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा प्रक्रीयेचे कामास 2022-2023 करीता दिनांक 1 एप्रील 2022 ते 30 जून 2022 पर्यत तीन महिने मुदतवाढीस कार्योत्तर मान्यतेसह प्रशासकीय तथा वित्तीय मान्यता देण्यास ही सभा मंजूरात देत आहे.

विषय क्रमांक 4 :-प्रभाग क्र.2 शिवाजी नगर वार्डातील डॉ.ज्ञानदेव पाटील ते श्री येडेश्वरी देवी मंदीर पर्यत टाकाण्यात आलेल्या पिण्याच्या पाण्याच्या प्रेशर लाईनला अंतर्गत गल्ल्यांमध्ये जोडणी करणे व जुन्या पाईप लाईन वरील नळ कनेक्शन नवीन लाईनवर शिफ्टींग करणेबाबत

वरील विषयासंबधीची पाणी पुरवठा अभियंता व मा.मुख्याधिकारी यांनी सादर केलेल्या टिप्पणीचे वाचन व विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,वैशिष्टयपुर्ण निधीअंतर्गत डॉ.ज्ञानदेव पाटील ते येडेश्वरी माता मंदीर प्रेशर लाईन (200mm) काम पुर्ण झाले असून त्यामध्ये अंतर्गत गल्ल्या जोडणेबाबत.अंदाजपत्रकात तरतुद नसून जूनी पाईप लाईन अंदाजे 10 फुट खोल असून नाली क्रासीग करुन नागरीकांचे नळ कनेक्शन गेलेले आहेत.तरी सदर कनेक्शन मिळत नसल्यामुळे जूनी लाईन डेड करुन नविन पाईप लाईनवर कनेक्शन शीफ्ट न केल्यास नागरीकांच्या रोशास प्रशासनास सामोरे जावे लागु शकते.तरी वैध नळ कनेक्शन धारकांचे यादी वसुली लिपीक यांच्याकडून घेऊन त्यांचे नळ कनेक्शन हस्तांतरीत करणे योग्य राहील.

ठरविण्यात येते की, पाणी पुरवठा अभियंता यांनी सादर केलेल्या टिप्पणी नुसार प्रभाग क्र.2 मधील विषयांकीत पाईप लाईनचे कामावरील अंतर्गत गल्ल्यांची जोडणी व नळ कनेक्शनचे शिफ्टींगचे कामकरण्यास तसेच येणारा खर्च 15 व्या वित्त अयोगानिधी अंतर्गत करण्यास मंजूरात देत आहे.

विषय क्रमांक 5 :- प्रभाग क्र.2 शिवाजी नगर वार्डातील छत्रपती शिवाजी महाराज

पुतळा ते श्री.येडेश्वरी देवी मंदीरापर्यंत ट्री-मिक्स सिमेंट काँक्रीट रस्ता व गटार बांधणेबाबत

वरील विषयासंबधीची मा.मुख्याधिकारी यांनी सादर केलेल्या टिप्पणीचे वाचन व विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,माजी न.प.सदस्य राजेंद्र वाडेकर यांचे सोबतचे पत्रानुसार त्यांनी प्रभाग क्र.2 अंतर्गत शिवाजी नगर वार्डात पाईप लाईन टाकतांना छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते श्री.येडेश्वरी देवी मंदीरापर्यंत रस्ताचे व गटाराचे नुकसान झाल्यामुळे त्या भागातील रहिवाशांना रहदारीस त्रास होत असून चालणे व दुचाकी वाहन चालविणे कठीण होत असल्याचे त्यांनी नमुद केले असून ट्री-मिक्स पध्दतीने सिमेंट काँक्रीट रस्ता व गटार बांधणेबाबत कळविले आहे. सदर काम जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना,जिल्हास्तरीय दलीतेत्तर योजना,आमदार निधी,खासदार निधीमधून घेण्याबाबत नमुद केले आहे.त्याभागातील रहिवाशांच्या रहदारीच्या दृष्टीने सदर भागातील रस्त्याच्या व गटाराचे काम करणे जरुरीचे असल्याचे नगर अभियंता ,बांधकाम विभाग यांनी टिप्पणीत नमुद केले आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करता नगर अभियंता यांनी सादर केलेल्या टिप्पणीनुसार पत्रा नमुद केलेल्या कामास जिल्हास्तरीय नगरोत्थान योजना, जिल्हास्तरीय दलीतेत्तर योजना,आमदार निधी,खासदार निधीमधून करण्यास हि सभा प्रशासकीय मंजूरात देत आहे.

विषय क्रमांक .6 :- अल्पसंख्यांक योजने अंतर्गत सन 2021-22 करीता मंजूर झालेल्या निधी अंतर्गत खालील कामांना मंजूरात मिळणे व मा.जिल्हाधिकारी साहेब,बुलडाणा यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यास मान्यता देणेबाबत

अल्पसंख्यांक योजने अंतर्गत सन 2021-22 करीता मंजूर झालेल्या निधी अंतर्गत खालील कामांना मंजूरात मिळणे व मा.जिल्हाधिकारी साहेब,बुलडाणा यांचेकडे प्रस्ताव पाठविण्याबाबतच्या विषयाची मा.मुख्याधिकारी यांच्या टिप्पणीचे सभेसमोर वाचन करण्यात आले व त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,शासन निर्णय नाक्षेवि-2021/प्र.क्र.81/का.9 दिनांक 31 मार्च 2022 नुसार अल्पसंख्यांक निधी सन 2021-22 अंतर्गत 50 लक्ष रुपये निधी मंजूर झालेला असून या अल्पसंख्यांक योजने अंतर्गत मलकापूर न.प.हद्दीतील खालील कामे प्रस्तावीत करण्यात आले आहे.

1. प्रभाग क्र.6 पारपेठ नवीन पूल ते असिफ किराणापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व नाली बांधकाम करणे.
2. मंगलगेट बाहेरील मालेखामिया कब्रस्थानला सुरक्षा भिंत बांधकाम करणे.

उपरोक्त प्रस्तावित दोन्ही कामांना (25+25 लक्ष) 50 लक्ष रुपयाचे कामांना प्रशासकीय मंजूरात घेवून सदर कामाचे प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी बुलडाणा यांचेकडे पाठवावे लागतील.असे नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी टिप्पणीत नमुद केले आहे.

वरील सर्वबाबीचा विचार करता उपरोक्त काम क्र.1 व 2 चे कामांना (25+25 लक्ष याप्रमाणे) अल्पसंख्याक योजने अंतर्गत सन 2021-22 करीता मंजूर झालेल्या 50 लक्ष रुपये निधीतून करण्यास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

नगर परिषद मलकापूर जि. बुलडाणा

आर यु सुरडकर
प्रशासक
नगरपरिषद मलकापूर